प्रेस नोट

**रेल्वेमध्ये चोऱ्या करणाऱ्या सराईत गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद**

---

फिर्यादी नामे सिम्रान नियाउददीन शेख ,वय.२४ वर्षे ,धंदा.नोकरी ,पत्ता.८१७ ,भवानी पेठ ,पदमजी पोलीस चौकी जवळ ,पुणे हे दि. १५/५/२०१८ रोजी २१.५० वा.सुमारास सहयाद्री एक्सप्रेसने सि एस टी ते पुणे असा दरवाज्यात बसुन प्रवास करत असताना पिंपरी रेल्वे स्टेशन येथुन गाडी सुटलेनंतर गाडी हळु हळु जात असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांच्या हातावर फटका मारुन मोबाईल खाली पाडुन चोरुन नेला आहे.म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आहे

पुणे रेल्वे स्टेशन हददीमध्ये रेल्वेतील गुन्हयांना आळा बसण्यासाठी रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर कारवाई करणेबाबत मा.पोलीस अधीक्षक सो.लोहमार्ग पुणे श्री .दिपक साकोरे यांनी स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे याना आदेश दिला .त्याप्रमाणे पोलीस नाईक अमरदिप साळुंके यांना खबऱ्यामार्फत खात्रीशिरपणे माहिती मिळाली की पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार आकाश नागनाथ तुपसुदरे हा रेल्वेमध्ये गुन्हे करत आहे मिळालेल्या खबरीप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे येथील स्टाफने वडगाव रेल्वे स्टेशन येथे सापळा लावला असता रात्रीच्या वेळेस आकाश नागनाथ तुपसुंदरे ,वय.२१ वर्षे ,रा.दळवीनगर झोपडपटटी ,चिंचवड ,जि.पुणे हा आरोपी गुन्हा करण्याच्या इरादयाने मिळुन आला.त्याचेकडे अंगझडतीमध्ये तीन मोबाईल मिळुन आले. त्याने सदरचे तीन मोबाईल रेल्वेमध्ये चोरल्याचे व विकण्यासाठी जवळ बाळगल्याचे सांगितली या आरोपीकडुन तपासामध्ये १) **६७,९००/ –रु किमतीचा सॅमसंग नोट ८ २) १५,४९९/ –रु किमतीचा एम आय कंपनीचा ३) १०,००० / –रु किमतीचा रेडमी वाय १ लाईट असे एकुण ९३,३९९/ –रु किमतीचे ३ महागडे मोबाईल जप्त करण्यात** आले असुन पुणे लो.पो.ठाणे येथील दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.सदरचा आरोपी हा पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथील रेकॉर्डवरील आरोपी असुन त्याचेवर यापुर्वी तीन गुन्हे दाखल आहेत.तसेच वडगाव मावळ पोलीस ठाणे येथे एक गुन्हा दाखल आहे.हा आरोपी हा कारागृहातुन सुटुन आल्यानंतर पुन्हा चोऱ्या करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

मा.पोलीस अधीक्षक .लोहमार्ग पुणे श्री.दिपक साकोरे साहेब व अपर पोलीस अधिक्षक श्रीमती कवीता नेरकर – पवार मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे मौला सय्यद ,स.पो.निरी.मिलींद झोडगे ,पोलीस कर्मचारी अमरदिप साळुंके , सचिन पवार ,विशाल पवार इम्तीयाज अवटी यांनी सदरची कामगिरी केली आहे.

**सध्या निवडणुकीच्या अनुषंगाने रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर जरब बसावी व गुन्हयांना आळा बसण्यासाठी पुणे रेल्वे जिल्हयामध्ये ६४९ प्रतिबंधात्मक केसेस केल्या असुन ,वारंटमधील आरोपी ,पाहीजे फरारी आरोपींवर कारवाई करणेबाबत पथके तयार केली असलेबाबतची माहिती व.पो.निरी.मौला सय्यद स्था.गु.शाखा लो.पुणे यांनी दिली आहे.**

Bmaulal
PI 26.9.19

पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा,
लोहमार्ग, पुणे